राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२०/ 1175 दि. 06 MAR 2020

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय पदविका संस्था
पुणे विभाग

विषय – **रिट याचिका क्र.८०५१/२०१८**
श्रीमती माधुरी नागदेवे व इतर
विरुद्ध
महाराष्ट्र राज्य शासन ....

संदर्भ – मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/ न्याप्र /२०२०/१२३ दिनांक ०६/०३/२०२०

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०२०/प्र.क्र.११०/२०१०(ब)/तांशि-७ दि.२३/०१/२०१५ अन्वये शासकीय तंत्रनिकेतनातील ६२ कंत्राटी तत्वावर कार्यरत अध्यापकांच्या सेवा नियमित करण्यात आल्या आहेत.

तद्नुषंगाने सदर शासन निर्णयातील समाविष्ठ अध्यापकांपैकी , आपल्या आस्थापनेवर माहे नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी (२०१५) या कालावधीत सेवेत नसतांना सदर कालावधीचे वेतन अध्यापकांना अदा केलेले आहे का याबाबतची माहिती या कार्यालयांस आजच सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयांस मेलव्दारे सादर करण्यात यावी. (सोबत संदर्भिय पत्राची प्रत जोडलेली आहे.)

**तसेच माहिती निरंक असल्यास तसे लेखी कळवावे**. माहिती est.ropune@gmail.com या मेलवर पाठवावी.

6/3/2020
प्रशासकीय अधिकारी ,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्रशासन

# तंत्रशिक्षणसंचालनालय,महाराष्ट्रराज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९४७३ , ४२४/४३४

ई-मेल-desk4a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

न्यायालयीन प्रकरण

क्रमांक:- ४ अ/आस्था/न्याप्र/२०२०/९२३ दिनांक:- 06 MAR 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/औरंगाबाद/नाशिक/अमरावती/नागपूर

विषय :- रिट याचिका क्र.८०५१/२०१८
श्रीमती माधुरी नागदेवे व इतर
विरुध्द
महाराष्ट्र राज्य शासन

श्रीमती माधुरी तुलसीदास नागदेवे व इतर २७ अधिव्याख्यात्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे त्यांच्या कंत्राटी सेवा नियमित झाल्यानंतर नोव्हेंबद २०१३ ते जानेवारी २०१५ या कालावधीतील वेतनाची थकबाकी देण्याबाबत विषयांकित रिट याचिका दाखल केलेली आहे.

शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०२०/प्र. क्र.११०/२०१०(ब)/तांशि-७, दि.२३/०१/२०१५ अन्वये शासकीय तंत्रनिकेतनातील ६२ कंत्राटी तत्वावर कार्यरत अध्यापकांच्या सेवा नियमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयान्वये ज्या ६२ कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित करण्यात आल्या त्यापैकी काही अध्यापक माहे नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ या कालावधीत सेवेत नव्हते.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन आपणास कळविण्यात येते की, दि.२३/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये आपल्या विभागातील ज्या अध्यापकांच्या कंत्राटी सेवा नियमित करण्यात आल्या त्यापैकी जे अध्यापक माहे नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ या कालावधीत सेवेत नसतांना सदर कालावधीचे वेतन अध्यापकांना अदा केले किंवा कसे याबाबतची माहिती उलट टपाली संचालनालयास सादर करावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई